# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे

फोन.नं. ०२२-२९४५१००१

Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र १२९ दिनांक- १९/०५/२०२१

## अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाने एका आरोपीस ताब्यात घेवून अल्पवयीन मुलीची सुटका केली.

फिर्यादी यांनी त्यांची मुलगी वय १४ वर्ष हीस दि.१४/५/२०२१ रोजी कोणीतरी अज्ञात इसमाने, अज्ञात कारणावरुन फुस लावून पळवून नेले बाबत दिलेल्या तक्रारीवरुन काशिमीरा पोलीस ठाणे गुन्हा क्र. ३८६/२०२१ भादविसं.क. ३६३ प्रमाणे दाखल आहे.

सदर गुन्हयाचा **अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथक हे** समांतर तपास करीत असतांना, गुन्हयातील अपहृत मुलगी वय १४ वर्ष हिचा शोध घेणेसाठी माशाचा पाडा, काशिमीरा या परिसरामध्ये भेट देवून माहिती घेवून आजुबाजुच्या परिसरात अपहृत बालकाबाबत विचारपूस करीत असतांना, कपूरचंद भुज यांचा भाचा सुजीतकुमार गुप्ता वय वर्ष २१ रा. माशाचा पाडा, काशिमीरा, हा देखील गुन्हा घडला दरम्यान घर सोडून गेला आहे. अशी माहिती मिळाल्याने संशयीत सुजितकुमार याचा मामा व भाउु अनिल गुप्ता यांना समक्ष बोलावून अपहृत बालक व संशयीत सुजितकुमार यांचेबाबत अधिक माहिती घेतली असता, त्यांनी देखील सुजितकुमार घर सोडून गेला आहे अशी माहिती दिली.

त्यावरून अपहृत मुलगी व संशयीत इसम सुजीतकुमार गुप्ता हे रॉयल कम्पाऊन्ड प्रा.लि. कामन, ता.वसई, जिल्हा पालघर या ठिकाणी रहात असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी पोलीस पथक पाठवून कामन परिसरात शोध घेतला असता अपहृत मुलगी व संशयीत सुजीतकुमार हे कामन मार्केट जवळील चाळ, चिंचोटी कामन या ठिकाणी मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवून अल्पवयीन मुलीची सुटका करण्यात आली आली आहे.

. सदरची कामगिरी डॉ.श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे)मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर विभागाचे व.पो.नि.श्री. संपतराव पाटील, पो.हवा./२२६९ उमेश पाटील, पोहवा.१६३ रामचंद्र पाटील, पोशि.३६६० केशव शिंदे, तसेच भाईंदर पोलीस ठाण्याचे मपोशि. गवस यांनी केली आहे.